पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-२
सभावृत्तांत

दि.- ६/३/२०१४ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि.६/३/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.गव्हाणे सुरेखा शंकर सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.काळजे नितीन प्रताप
४ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५ मा.सुपे आशा रविंद्र
६ मा.गोफणे अनुराधा देविदास
७ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
८ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
९. मा.लोंढे शुभांगी संतोष

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.जगताप- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, श्रीम.पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री.माने- उपअभियंता, (पापु) श्री.जगताप- कार्यालयीन अधिक्षक.
मा.सभापती- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.
(इ-क्षेत्रीय कार्यालयाचे पहिले सभापती मा.सुरेखाताई गव्हाणे यांचा इ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने श्री.जगताप साहेब, उपअभियंता यांनी सत्कार केला.)
खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-
सुचक- मा.श्रध्दा लांडे अनुमोदक- मा.मंदा आल्हाट

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता असल्यामुळे आज दि. ६/३/२०१४ रोजीची सभा तहकूब करुन ती सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षातील सभेच्या दिवशी १५ मिनीटे अगोदर घेणेत यावी.
मा.सभापती - लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे आजची सभा तहकूब करुन ती सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षातील सभेच्या दिवशी १५ मिनीटे अगोदर घेणेत यावी.

(गव्हाणे सुरेखा शंकर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-२
सभावृत्तांत
(दि.६/३/२०१४ ची तहकूब सभा)

दि.- ७/५/२०१४ वेळ दुपारी १:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची तहकूब सभा बुधवार दि.७/५/२०१४ रोजी दुपारी १.४५ वाजता इ प्रभाग कार्यालयाचे सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.गव्हाणे सुरेखा शंकर सभापती
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.काळजे नितीन प्रताप
४ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५. मा.मडिगेरी वर्षा विलास
६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
७. मा.सुपे आशा रविंद्र
८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
९. मा.अजित दामोदर गव्हाणे
१०. मा.गोफणे अनुराधा देविदास
११. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१२. मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१३. मा.लोंढे शुभांगी संतोष

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.दुरगूडे- इ क्षेत्रीय अधिकारी, श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.साळवी-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.घोडे- कार्यकारी अभियंता विदयूत, श्री.पाटिल-उपअभियंता विदयुत, श्री.काळे- उपअभियंता,स्थापत्य, श्री.जगताप- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, श्रीम.पाठक-उपअभियंता ड्रेनेज, श्री.माने- उपअभियंता, (पापु), श्री.इनामदार- लेखाधिकारी,श्री.लगस-सहा.आरोग्याधिकारी, श्री.घोड- कनिष्ठ अभियंता, स्थापत्य श्री.जगताप- कार्यालयीन अधिक्षक.

( इ क्षेत्रीय अधिकारी यांनी प्रशासनाच्या वतीने उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचा पुष्पगूच्छ देवून सत्कार केला)

मा.सभापती- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

---

दि.६/०२/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- ३ विषय क्रमांक- १
दिनांक- ७/५/२०१४ विभाग- स्थापत्य
सूचक-मा. नितीन लांडगे अनुमोदक-मा.नितीन काळजे
संदर्भ- मा.नितीन लांडगे व मा.नितीन काळजे यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने भोसरी गावठाण प्रभागामध्ये कुस्ती आखाडयासमोर पाण्याच्या तलावाच्या बाजुने ब-याच वर्षापूर्वी छोटे छोटे गाळे उभारण्यात आले होते. सदर ठिकाणी मध्यंतरीच्या काळात पीएमपीएमएलचा बसस्टॉप करण्यात आलेला होता परंतु तो सध्या बंद केलेला आहे. सदर उभारलेले गाळे हे उभारलेल्या दिवसापासून ते आजतागायत वापरविना बंद अवस्थेत आहेत तसेच वापर नसल्याने सदर ठिकाणी ब-याचदा गैरप्रकार घडत असतात याठिकाणी भविष्यात गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहे एप्रिल २०१२ च्या मनपाच्या सर्वसाधारण सभेत सदर गाळे वाटप करण्याचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे तरी सदर गाळे निष्कासीत करुन उर्वरीत ठिकाणी भोसरी पोलीस स्टेशन अंतर्गत भोसरी पोलीस चौकी उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन दयावी व त्यासाठी आवश्यक असणारी डागडुजी व अनुषंगीक स्थापत्य विषय कामे करण्यात यावीत तसेच उर्वरीत मोकळया जागेत छोटेसे उदयान उभारुन सदर ठिकाणी जेष्ठ नागरीक महिला यांना बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात यावी. तरी वरील वापराविना पडून असलेले गाळे निष्कासीत करुन पोलीस चौकी व उदयानासाठी आवश्यक असलेली कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ४ विषय क्रमांक- २

दिनांक- ७/५/२०१४ विभाग- आरोग्य

सूचक-मा. नितीन लांडगे अनुमोदक-मा.नितीन काळजे

संदर्भ- मा.नितीन लांडगे व मा.नितीन काळजे यांचे पत्र.

भोसरी गावठाण प्रभागाअंतर्गत सिताराम लोंढे उदयानाच्या प्रवेशद्वारासमोरील कोप-यावर मनपाचे एक FRP चे स्वच्छतागृह उभारलेले आहे. सदर ठिकाणी रस्ता रुंदीकरण झाल्याने तेथील निचरा व्यवस्थीत होत नसल्याने आजुबाजूच्या परिसरात सतत

दुर्गंधी पसरलेली असते. मध्यंतरीच्या काळामध्ये मा.आरोग्य निरीक्षक व मा.आरोग्य अधिकारी क प्रभाग यांनी समक्ष पाहनी केलेली आहे तरी परिसरातील नागरिकांच्या मागणी वरुन सदर वापरात नसलेले स्वच्छतागृह त्वरीत निष्कासीत करुन तेथील परिसर

दुर्गंधीमुक्त करण्यास तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
(गव्हाणे सुरेखा शंकर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/१/३८९ /२०१४
दिनांक-२०/५/२०१४

**सही/-**
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.